Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ४६ ] सोमवार, ऑगस्ट २९, २०२२/भाद्रपद ७, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५६२.

### संचालक प्रकल्प, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल

### सूचना

क्रमांक Maha-Metro-TPO-HD-6192-2022.—

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे तरतुदीनुसार नागपूर महानगर क्षेत्राच्या विकास योजनेस शासन अधिसूचना क्रमांक TPS-2416-C.R.-122(A)-2016-SM-UD-9, दिनांक ५ जानेवारी २०१८ व क्रमांक TPS-2416-C.R.-122(B) E.P.-2016-UD-9, दिनांक २१ फेब्रुवारी २०१९ नुसार मंजुरी देण्यात आली आहे. तसेच शासनाच्या नगर विकास विभागाच्या अधिसूचना क्रमांक TPS-2417-183-C.R.-172-2017-UD-9, दिनांक ११ जून २०१८ नुसार महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडला अधिसूचनेसह संलग्न परिशिष्टात नमूद क्षेत्राकरिता “ **विशेष नियोजन प्राधिकरण** ” म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. सर्व्हे क्रमांक १८ मौजा निलडोह या जागेचा समावेश वरील परिशिष्टात असल्याने उक्त जागा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट आहे.

नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या भविष्यातील विस्तारासाठी आवश्यक डेपो सुविधा तसेच प्रकल्पाच्या संचालन व देखभालीसाठी नॉन फेअरबॉक्स महसूल निर्माण करण्यासाठी जमिनीचा वापर करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडद्वारे उक्त जागेचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६, कलम ३७ अन्वये उपयोग बदलाची कार्यवाही करण्यास दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार विकास योजनेत सूचविलेले प्रस्तावित फेरबदल खालीलप्रमाणे आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | सर्व्हे क्रमांक आणि मौजा | क्षेत्र | मंजूर विकास योजनेप्रमाणे उपयोग | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६, कलम ३७ नुसार प्रस्तावित उपयोग |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | हे. आर | | |
| १ | १८ निलडोहपैकी | १६ ९० | मेट्रो डेपो | वाणिज्यीक |

West-METD001

उपरोक्त प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नागपूर महानगर क्षेत्र विकास योजनेचा भाग नकाशा टाउन प्लॅनिंग ऑफिसर, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, मेट्रो भवन, व्हीआयपी रोड, दीक्षाभूमीजवळ, रामदासपेठ, नागपूर या विभागात कामकाजाचे सर्व दिवशी कार्यालयीन वेळात जनतेच्या निरिक्षणासाठी खुला ठेवण्यात आला आहे. तरी नागरिकांना सूचित करण्यात येते की, ही सूचना शासकीय राजपत्रात प्रकाशित झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत

विकास योजनेतील उपरोक्त फेरबदलाच्या संबंधात ज्या लेखी सूचना किंवा हरकती, टाउन प्लॅनिंग ऑफिसर, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड या विभागात प्राप्त होतील त्यावर महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडद्वारे विचार होऊन, नंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल.

सदर सूचना व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड यांच्या मान्यतेने प्रसिध्द करण्यात येत आहे.

**महेश कुमार,**
संचालक प्रकल्प,
महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, नागपूर.

नागपूर :
दिनांक २९ ऑगस्ट २०२२.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५६३.

BY DIRECTOR PROJECT, MAHARASHTRA METRO RAIL CORPORATION LIMITED

**MODIFICATION U/S 37 OF MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966**

*NOTICE*

No. Maha-Metro-TPO-HD-6192-2022.—

The Final Development Plan of Nagpur Metropolitan Area prepared under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 has been sanctioned by Government *vide* Urban Development Department Notification No. TPS-2416-C.R.-122(A)-2016-SM-UD-9, dated the 5th January 2018 and TPS-2416-CR-122(B) E. P.-2016-UD-9, dated the 21st February, 2019. Also, Maharashtra Metro Rail Corporation Limited has been declared as "Special Planning Authority" in respect of areas as per schedule appended *vide* Govt. Notification No. TPS-2417-183-CR-172-2017-UD-9, dated 11th June 2018. Land bearing Kh. No. 18, Mouza Nildoh reserved for Metro Depot West-A-METD001 is included in the said schedule and therefore, Maha-Metro being Special Planning Authority for the said Land, is empowered to initiate modification proposal under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 to the Development Plan of Nagpur Metropolitan Area in respect of the said land.

In the said Final Sanctioned Development Plan, the Maharashtra Metro Rail Corporation Limited is desirous of making some modification u/s 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for the purpose of utilization of land for generation of Non-Farebox Revenue for Operation and Maintenance of Nagpur Metro along with expansion of Depot facilities for future extension of Metro network. Accordingly, Maharashtra Metro Rail Corporation Limited *vide* approval dated 12th August 2022 consented to make the aforesaid modification in Development Plan of Nagpur Metropolitan Area. The aforesaid modification aproposed is as under,–

SCHEDULE

| Sr. No. | Kh. No. & Mouza | Area | User as per Sanctioned Development Plan | Proposed Change U/s 37 of M. R. & T. P. Act, 1966 |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| | | H. A. | | |
| 1 | 18 Mouza Nildoh (Part) | 16 90 | Metro Depot West A-METD001 | Commercial |

The Part Plan of Sanctioned Development Plan of Nagpur Metropolitan Area showing the proposed modification is displayed in the Office of the Town Planning Officer, Maharashtra Metro Rail Corporation Limited, Metro Bhavan, VIP Road, Near Dikshabhoomi, Ramdaspeth, Nagpur-440010 during office hours on all working days. The suggestions and objections (in writing) which may be received by Town Planning Officer, Maharashtra Metro Rail Corporation Limited in respect of the said modification to the Sanctioned Development Plan of Nagpur Metropolitan Area within a period of one month from the date of publication of this notie in the *Official Gazette* will be considered. After hearing and final decision on suggestions and objections, the said modification proposal will be submitted to the Government for sanction.

This Notice is published with approval of Managing Director, Maharashtra Metro Rail Corporation Limited.

MAHESH KUMAR,
Director Project,
Maharashtra Metro Rail Corporation Limited, Nagpur.

Nagpur :
Dated the 29th August 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.